Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भारतीय शिक्षण मंडळ संचालित भारतीय शिक्षण या मासिकात २०१४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषण

**Jyotsana Dawande**

Crossref DOI -

---

**सारांश :**

*महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ संचालित भारतीय शिक्षण या मासिकात 2014 मध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषण करण्यात आलेले आहेत. भारतीय शिक्षण हे मासिक दर महिन्याला प्रकाशित होत असल्याने याचे एकूण बारा अंक आहेत व एका अंकामध्ये साधारणतः 12 ते 15 लेख प्रकाशित झालेले आहेत, त्यामुळे या बारा अंकांचे मिळून एकूण 209 लेख प्रकाशित झालेले आहेत. लेखांमध्ये शिक्षणावर आधारित जास्तीत जास्त लेख आलेले आहेत.जसे, मूल्यशिक्षण, उच्चशिक्षण, शेतीविषयक शिक्षण, खेळातून शिक्षण इत्यादी. तसेच व्यक्तिमत्व विकासाचे पण लेख संख्येने जास्त आहेत. थोर पुरुषांचे शिक्षण कार्यात योगदान व शैक्षणिक विचार यासंबंधातही लेख प्रकाशित झालेले आहेत. या लेखांमध्ये गुरुवाणी, संपादकीय हे लेख भारतीय शिक्षण मासिकाच्या बाराही अंकात प्रसिद्ध झालेले असून त्यांचा प्रत्येक अंकातील गुरुवाणी व संपादकीय चे विषय वेगवेगळे असून महत्त्वपूर्ण माहिती यात दिलेली आहेत. मासिकाचा संपूर्णपणे अभ्यास केला असता असे लक्षात आले की, या कालावधीत शिक्षणाचे बदलते स्वरूप, राजकीय- आर्थिक घडामोडी, संशोधन प्रवृत्ती, तंत्रज्ञान इत्यादी विविध लेखांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.*

**कळशब्द :** मासिक, लेख, कालावधी, भारतीय शिक्षण, प्रकाशन इत्यादी.

---

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती ही संपूर्ण विश्वात श्रेष्ठ मानली जाते. या देशाने विश्वाला अमूल्य तत्त्वांचे मार्गदर्शन केलेले आहे. भारताची धर्माविषयी संकल्पना ही व्यापक आहे. मानवाच्या उद्धाराची तत्वे ही भारताच्या प्राचीन-वैदिक धर्मात अंतर्भूत आहेत. या भारत भूमीतील ज्ञान संस्कृती विश्वाने सन्मानित केलेली आहे. मनुष्याला बुद्धीचे वरदान असल्यामुळे तो विद्येने परिपूर्ण होऊ शकतो. समृद्धी मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाला उत्तुंग बनविते. प्राचीन काळी ऋषीमुनींनी आपली आयुष्य ज्ञानाच्या उपासनेत व्यतीत केली. वैदिक काळात ज्ञानार्जनासाठी गुरुगृही शिष्यांचा निवास असायचा, त्यामुळे गुरु आपल्या शिष्यांचा सर्वांगीण विकास साधत असे, असा भारत वर्ष फार प्राचीन काळापासून एक गौरवशाली देश म्हणून प्रसिद्ध आहे. कालांतराने भारतात व्यापारी युरोपियन कंपन्या स्थापन झाल्या व त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करायला सुरुवात केली. तसेच भारतात शिक्षणाचे क्षेत्र विकसित करण्याचे ठरवले. कालांतराने लॉर्ड मेकॉले हा भारतात आला व त्याला भारतीय शिक्षण देणाऱ्या संस्था चालू ठेवणे व त्याचा विकास करण्यात यावा हे मुळीच मान्य नव्हते. मेका ॅलेनी इंग्रजीला उचलून धरले व भाषेमध्ये

इंग्रजी ही अग्रगण्य भाषा आहे असे भारतीयांना पटवून दिले. कालांतराने आपल्या इथे कॉन्व्हेंट शाळा पद्धती सुरू झाली व भारतीयांनी इंग्रजी शिक्षणाची कास धरली याचाच परिणाम म्हणून हळूहळू आपली गुरुकुल पद्धती,भारतीय शिक्षण पद्धती संपुष्टात यायला सुरुवात झाली आणि आज तर पाश्चिमात्य संस्कृतीमुळे आपल्या संस्कृतीचा आपल्याला पूर्णपणे विसर पडलेला आहे.ही संस्कृती जपण्याचा व घरोघरी पोहोचवण्याचा तसेच भारतीय विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षणाद्वारे भारतात उपलब्ध असणाऱ्या सर्वोत्कृष्ट साधनांनी साधलेले सर्वोत्तम शिक्षण म्हणजेच भारतीय शिक्षण हे भारत केंद्रीतच असले पाहिजे या दृष्टीने भारतीय शिक्षण मासिकाची सुरुवात झाली. या मासिकातून आपली भारतीय संस्कृती परंपरा, शिक्षण हे सगळे पटवून देण्याचा प्रयत्न या मासिकाद्वारे होत आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवणे, समाजातील सर्व घटकांना ते उपलब्ध करून देणे, सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून समाजाची शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी विकसित झाली पाहिजे हे या मासिकाचे उद्दिष्ट आहे.

भारतीय शिक्षण हे मासिक शिक्षणाक्षेत्रातील विषयावर विचार करणारे प्रभावी केंद्र आहे. भारतीय शिक्षण मासिकाच्या प्रत्येक अंकामधून समाजातील वेगवेगळ्या विषयांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.जसे, राजकीय घडामोडी,आर्थिक उलथापालट, व्यक्तिमत्व विकास,विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखती, विद्यार्थी-शिक्षक-पालक संबंध,तंत्रज्ञान, शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या इत्यादी अशा विविध विषयांवर तज्ञांनी या मासिकाच्या माध्यमातून आपली मते मांडलेली आहेत.

या मासिकामध्ये 2014 या कालावधीत गुरुवाणी, संपादकीय, भारतीय शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण, मान्यवरांना श्रद्धांजली, उच्च शिक्षण, राजकारण,महिला समस्या, अध्ययन, अध्यापन, शालेय उपक्रम, पर्यावरण, सण- उत्सव,गुरूंचे महत्त्व, तत्त्वज्ञान,मानसशास्त्र, मातृभाषेतून शिक्षण इत्यादी यासारख्या अनेक विषयांवर माहिती पूर्ण लेख प्रकाशित झालेले आहेत. दीपावली विशेषांकामुळे व्यक्तिमत्व विकास व भारतीय संकल्पना हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे.

**उद्देश :**

- प्रकाशित लेखांचा आशय आशय समजून घेणे.
- प्रकाशित झालेल्या लेखांमधून विषयांचा शोध घेणे.
- लेखकांच्या लिंग प्रकारानुसार माहिती देणे.
- शिक्षकांची भूमिका समजून घेणे.

**संशोधनाची पद्धत :**

प्रस्तुत अभ्यासामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून आशय विश्लेषण तंत्र वापरलेले आहे.

Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

## विषय प्रकारानुसार माहिती तक्ता १

| अ. क्रं. | विषय | लेख | टक्केवारी | अ. क्रं. | विषय | लेख | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यक्तिमत्व विकास | २७ | १२.८६% | ५३ | दैनंदिनी | १ | ०.४८% |
| २ | शिक्षण | १४ | ६.६७% | ५४ | धर्मशिक्षण | १ | ०.४८% |
| ३ | कविता | ९ | ४.२९% | ५५ | नाते | १ | ०.४८% |
| ४ | पुरस्कार | ७ | ३.३३% | ५६ | निवेदन | १ | ०.४८% |
| ५ | राष्ट्रीय शिक्षण | ६ | २.८६% | ५७ | नोंदी | १ | ०.४८% |
| ६ | अध्यापन | ४ | १.९०% | ५८ | पत्र | १ | ०.४८% |
| ७ | पुस्तक परिचय | ४ | १.९०% | ५९ | पर्यावरण | १ | ०.४८% |
| ८ | वाचन व सुधार प्रकल्प | ४ | १.९०% | ६० | पसायदान | १ | ०.४८% |
| ९ | शारीरिक व राष्ट्रीय शिक्षण | ४ | १.९०% | ६१ | प्रतिज्ञा | १ | ०.४८% |
| १० | स्त्री शक्ती | ४ | १.९०% | ६२ | प्रवास | १ | ०.४८% |
| ११ | स्मरणांजली | ४ | १.९०% | ६३ | बालकांचा भाषा विकास | १ | ०.४८% |
| १२ | निवडणूक | ३ | १.४३% | ६४ | बालकामगार | १ | ०.४८% |
| १३ | बुद्धिमत्ता | ३ | १.४३% | ६५ | बालहक्क व शिक्षण | १ | ०.४८% |
| १४ | मातृभाषा | ३ | १.४३% | ६६ | बौद्ध धर्म आणि अनुसूचित जाती | १ | ०.४८% |
| १५ | विद्यार्थी विकास, उद्योजक,बुद्धिमत्ता | ३ | १.४३% | ६७ | भारतीय तत्त्वज्ञान व मानसशास्त्र | १ | ०.४८% |
| १६ | वृतांत | ३ | १.४३% | ६८ | भारतीय संस्कृती | १ | ०.४८% |
| १७ | अध्ययन | २ | ०.९५% | ६९ | भारतीयत्व | १ | ०.४८% |
| १८ | अध्यात्म | २ | ०.९५% | ७० | भावना | १ | ०.४८% |
| १९ | आठवणी | २ | ०.९५% | ७१ | भाषा | १ | ०.४८% |
| २० | उच्च शिक्षण' | २ | ०.९५% | ७२ | भूगोल | १ | ०.४८% |
| २१ | गणित | २ | ०.९५% | ७३ | भ्रष्टाचार | १ | ०.४८% |
| २२ | गुरु | २ | ०.९५% | ७४ | भ्रूण हत्या | १ | ०.४८% |
| २३ | चर्चा | २ | ०.९५% | ७५ | महिला अत्याचार | १ | ०.४८% |

Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | ताण व विद्यार्थी | २ | ०.९५% | ७६ | महिला आणि आरोग्य | १ | ०.४८% |
| २५ | थोर पुरुष | २ | ०.९५% | ७७ | मानसशास्त्र | १ | ०.४८% |
| २६ | थोरांचे शिक्षण/शैक्षणिक विचार | २ | ०.९५% | ७८ | मुलांना शिक्षण | १ | ०.४८% |
| २७ | धर्म ग्रंथ | २ | ०.९५% | ७९ | मुलाखत | १ | ०.४८% |
| २८ | बी एड | २ | ०.९५% | ८० | मुल्मापन | १ | ०.४८% |
| २९ | मूल्यशिक्षण व शाळा | २ | ०.९५% | ८१ | मेळावा वाचक | १ | ०.४८% |
| ३० | शालेय शिक्षण व तंत्रज्ञान | २ | ०.९५% | ८२ | मैत्र | १ | ०.४८% |
| ३१ | शाळा | २ | ०.९५% | ८३ | यशस्वी जीवन | १ | ०.४८% |
| ३२ | शिक्षक | २ | ०.९५% | ८४ | लेखक | १ | ०.४८% |
| ३३ | शिक्षण अधिकार | २ | ०.९५% | ८५ | वर्ग व्यवस्थापना | १ | ०.४८% |
| ३४ | शिक्षण महर्षी | २ | ०.९५% | ८६ | वारी | १ | ०.४८% |
| ३५ | श्रद्धांजली | २ | ०.९५% | ८७ | वेळ व्यवस्थापना | १ | ०.४८% |
| ३६ | स्मरणांजली | २ | ०.९५% | ८८ | शालेय उपक्रम | १ | ०.४८% |
| ३७ | अभ्यास | १ | ०.४८% | ८९ | शिक्षक दिन | १ | ०.४८% |
| ३८ | आंतरजाल | १ | ०.४८% | ९० | शिक्षक प्रशिक्षण | १ | ०.४८% |
| ३९ | आकलन क्षमता | १ | ०.४८% | ९१ | शिक्षण उपक्रम | १ | ०.४८% |
| ४० | इंद्रिया | १ | ०.४८% | ९२ | शिक्षण संस्था | १ | ०.४८% |
| ४१ | इतिहास | १ | ०.४८% | ९३ | शैक्षणिक आयोग | १ | ०.४८% |
| ४२ | ई-वेस्ट व्यवस्थापना | १ | ०.४८% | ९४ | शैक्षणिक परिवर्तन | १ | ०.४८% |
| ४३ | उत्सव | १ | ०.४८% | ९५ | संख्याशास्त्र अध्यापन | १ | ०.४८% |
| ४४ | उद्योजकता | १ | ०.४८% | ९६ | संघटना | १ | ०.४८% |
| ४५ | कार्यानुभव | १ | ०.४८% | ९७ | संत वाणी | १ | ०.४८% |
| ४६ | खाद्य संस्कृती | १ | ०.४८% | ९८ | संताचे शैक्षणिक विचार | १ | ०.४८% |
| ४७ | गणितज्ञ | १ | ०.४८% | ९९ | संशोधन | १ | ०.४८% |
| ४८ | गीत | १ | ०.४८% | १०० | सकारात्मकता | १ | ०.४८% |
| ४९ | ग्रामीण प्राध्यापकांना विज्ञान शिकविण्यात अडचणी | १ | ०.४८% | १०१ | सर्जनशीलता | १ | ०.४८% |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | चिंतन | १ | ०.४८% | १०२ | सहल शैक्षणिक | १ | ०.४८% |
| ५१ | जवाबदारी | १ | ०.४८% | १०३ | स्पर्धा | १ | ०.४८% |
| ५२ | जीवन कौशल्य | १ | ०.४८% | १०४ | स्वभाव | १ | ०.४८% |

वरील तक्त्यातील विषयांचे सविस्तर विश्लेषण यामध्ये पुढील प्रमाणे केलेले आहेत, व्यक्तिमत्त्व विकासाबद्दलच्या लेखांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास व भारतीय संकल्पना, अध्यात्म व भगवद्गीतेतून व्यक्तिमत्व विकास, व्यक्तिमत्व विकासाची सप्तपदी,पतंजली दर्शन व व्यक्तिमत्त्व विकास, गीता व पतंजली दर्शनानुसार व्यक्तिमत्त्व विकास, भारतीय तत्त्वज्ञान व व्यक्तिमत्व विकास, अनौपचारिक शिक्षण व व्यक्तिमत्व विकास, व्यक्तिमत्व विकासाची शिक्षकाची भूमिका, व्यक्तिमत्व विकास व उपयोग इत्यादी यासारखे भरपूर लेख व्यक्तिमत्व विकासाशी संबंधित या मासिकात आलेले आहेत. शिक्षणामध्ये अनौपचारिक शिक्षण, उच्च शिक्षण, मूल्यशिक्षण, अर्थपूर्ण शिक्षण, शिक्षणातून सेवा व शारीरिक शिक्षण, राष्ट्र व शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, तंत्रज्ञान शाळा व शिक्षण, नव शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण व संस्कृत? कला व शिक्षण इत्यादी यासारखे प्रामुख्याने जास्तीत जास्त लेख शिक्षणाची संबंधित यामधे आहेत. कवितेमध्ये माझी मराठी व माझा महाराष्ट्र, गुढीपाडवा आला, नाते, गुरु व शिष्य, याला जीवन ऐसे नाव, शिक्षण क्षेत्र, रे माणसा,मूल समजून घेऊया, शिक्षणाचे गीत गाऊ, परीसर सारा स्वच्छ करू, शिक्षण यासारख्या कवितांचा अंतर्भाव केला आहे. पुरस्कारामध्ये राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार, राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षण यामध्ये राष्ट्रीय शिक्षण आणि संस्कृत, राष्ट्रीय शिक्षण, सर्वांगीण विकास यासारखे विषय सविस्तर मांडण्यात आलेले आहेत. अध्यापनामध्ये अध्यापन व जीवन कौशल्य,अध्यापन विकास,अध्यापनात येणाऱ्या अडचणी,क्रमान्वित अध्ययन इ. अध्यापन सुद्धा यामधे समाविष्ट आहेत. पुस्तक परिचयामध्ये पुस्तक परिचय बोधकथा, स्वामी विवेकानंद, निरंतर चैतन्य, सण उत्सव, संस्था दर्पण इत्यादी विषय आलेले आहेत. वाचन सुधार या विषयावर या मासिका सविस्तर लेख आलेले आहेत. शारीरिक व राष्ट्रीय शिक्षण विषयावर माहितीपूर्ण लेख प्रकाशित झालेले आहेत. स्त्री विषयावर स्त्री सक्षमीकरण, महिला व आरोग्य याविषयी लेख आलेले आहेत. श्रद्धांजली या सदरात पेठेसर, मेहरू सर, डॉक्टर रमेश श्रीधर जोशी,श्री व.ना.जोग इत्यादी मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. निवडणूक व राजकारण, विद्यार्थ्यांचा विकास, अध्ययन,अध्यात्म, भूतकाळात घडलेले प्रसंग, उच्च शिक्षण,गणित, गुरूंचे महत्त्व, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व वाचन त्यातून निर्माण झालेल्या समस्या व त्याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांना येणारा ताण, बीएड प्रशिक्षण, मूल्य शिक्षण व शाळा, आपले भारतीय विविध धर्मग्रंथ, शाळा व शिक्षक, शिक्षणाचे अधिकार, अभ्यास, आंतरजालामुळे होणारे फायदे व नुकसान, इतिहास, ई-वेस्ट चे व्यवस्थापन, साजरे होणारे विविध सण, उत्सव, उद्योजकता, कार्यानुभव, खाद्य संस्कृतीचे विविध प्रकार,थोर पुरुषांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा, भगवान महावीर, डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी थोर पुरुषांच्या कार्याचा इथे आढावा घेण्यात आला.थोर पुरुषाची कार्य व त्यांचे शिक्षणातील योगदान याचा येथे आढावा घेतल्या गेला. गणित तज्ञामध्ये भास्कराचार्यांचा उल्लेख येथे केलेला आहे. ग्रामीण भागातील प्राध्यापकांना विज्ञान शिकवताना येणाऱ्या अडचणींचा येथे अभ्यास करण्यात आलेला आहे. चिंतन, जबाबदारी, जीवन जगणयासाठी लागणारी कौशल्य, दैनंदिनी लिहिण्याचे फायदे,धर्माबद्दल शिक्षण,

नाते ,कुटुंब,पर्यावरण, पसायदान, प्रतिज्ञा, प्रवास वर्णन व आलेले अनुभव, बालकांच्या भाषेचा विकास कसा करायचा इत्यादी येथे नमूद करण्यात आले. बालकामगार,बाल हक्क व शिक्षण, विविध धर्म, भारतीय संस्कृती, भारतीयत्व, भावना, भाषा, भूगोल, भ्रष्टाचार, भ्रूणहत्या, महिलांवरील अत्याचार, मानसशास्त्र, मुलांना शिक्षण कोणत्या पद्धतीने द्यायचे, मान्यवरांच्या मुलाखती, मैत्रीचे महत्त्व, यशस्वी जीवन, लेखक, वर्ग व्यवस्थापन, वेळ व्यवस्थापन, शाळेत घेतल्या जाणारे विविध उपक्रम, शिक्षक दिनाचे महत्त्व,शिक्षक प्रशिक्षण,शिक्षक उपक्रम, शिक्षण संस्था,शैक्षणिक आयोग, शैक्षणिक परिवर्तन, संख्याशास्त्र, संघटना, संतवाणी, संतांचे शैक्षणिक विचार,संशोधन, सकारात्मकता, शैक्षणिक सहली,स्वभाव इत्यादी व यासारख्या विषयांवर विस्तृत लेख आलेले आहेत,वृत्तांत या सदरात लेखक मेळावा वृत्तांत, भारतीय शिक्षण मंडळाने घेतलेले विविध कार्यक्रम वृत्तांत,वृत्तांत इत्यादी वृत्तांताची माहिती या सदरात देण्यात आली. निवेदनामध्ये भारतीय शिक्षण मंडळाने घेतलेल्या विविध शैक्षणिक स्पर्धा, शैक्षणिक स्पर्धा निवेदन तसेच वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या स्पर्धांचे निवेदन यात दिले गेलेले आहेत. भारतीय शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारे राज्यस्तरीय व राष्ट्रस्तरावरील घेण्यात येणाऱ्या बैठकीबद्दल यात सांगितलेले आहेत.अशा प्रकारे विविध स्तरावरील विविध माहितीयुक्त असे लेख या मासिकात आलेले आहेत.

**लिंग प्रकारानुसार माहिती तक्ता २**

| लिंग | संख्या | वर्गीकृत लेखकांची टक्केवारी |
|---|---|---|
| पुरुष | १२६ | ६५.२८% |
| स्त्री | ६७ | ३४.७२% |
| एकूण | १९३ | १००% |

लेखकत्वाच्या तक्त्यानुसार, असे दिसून येते की २०१४ या मासिकात १२६ पुरुष आणि ६७ महिला लेखकांच्या नोंदी दिसून येतात. अशा प्रकारे, वर्गीकृत लेखकांमध्ये पुरुषांचे प्रमाण ६५.२८% होते, तर महिलांचे प्रमाण ३४.७२% होते. प्रत्येक एका महिलेच्या नोंदीमागे साधारणपणे १.८८% पुरुष लेखक होते. लेखकांच्या या नोंदी दुय्यम स्रोतावरून घेतल्या गेल्या आहेत; त्यामुळे, जर दुय्यम स्रोतामध्ये एकाच लेखकाने एकाच लेखासाठी योगदान दिले असल्याचे स्पष्टपणे नमूद नसेल, तर या नोंदींवरून लेखाच्या लेखकांची नेमकी संख्या निश्चित करता येणार नाही.

लिंग प्रकारानुसार माहिती:- भारतीय शिक्षण मासिकाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, पुरुष लेखकांचे योगदान जास्ती असून त्या मानाने महिला लेखकांचे प्रमाण कमी दिसून येते.

**शिक्षकांची भूमिका :**

राष्ट्रीय शिक्षणात संस्कृतचे स्थान, राष्ट्रीय शिक्षण, आईची महती, अनुभव, प्रज्ञा विकसन, थोर पुरुषांचे शैक्षणिक विचार, शैक्षणिक योगदान, व्यक्ती चरित्र, भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये, भाषा विषय,उद्योज क्षमता व

कौशल्य विकास,शैक्षणिक प्रगती व सर्जनशीलता, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी जाणून घेणे,बाल कामगार समस्या, अध्यापन विकासाचा दर्जा उंचावणे, उच्च शिक्षणातील गुणवत्ता, रयत शिक्षण संस्था, प्रश्नांचे महत्त्व,बुद्धिमत्ता, जीवन, कौशल्य, बालक भाषा, भूगोल,विज्ञान संच, सहशालेय उपक्रम,संशोधन, स्त्री सक्षमीकरण,बौद्ध धर्म, क्रमन्वित अध्ययन इत्यादी.ई- वेस्ट व्यवस्थापन,आदर्श, नीतिमूल्य,भ्रूण हत्या,प्रवास सहल, महिला आरोग्य, शिक्षणातील विषमता, वाचक मेळावा, निवडणूक, इंटरनेट, वर्ग व्यवस्थापन,शैक्षणिक आयोग,शिक्षणाचा अधिकार, संस्कार दर्पण, राष्ट्र उभारणी, ताण तणाव,शिक्षक दिन, विशेष नोंदी, विविध उपक्रम, बालभारती, बालहक्क, व्यक्तिमत्व विकास, अनौपचारिक शिक्षण, वाचन सुधार कार्यक्रम,≈आत्मनिर्भर समाज या विविध विषयांवर डॉक्टर प्राध्यापक व शिक्षकांनी आपापली मते विस्तृत व स्पष्टपणे मांडलेली आहेत.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ संचालित भारतीय शिक्षण या मासिकात 2014 मध्ये प्रकाशित झालेल्या वेगवेगळ्या लेखांमधून विविध निष्कर्ष निघतात. भारतीय शिक्षण मासिक हे शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे शैक्षणिक मुद्रित साधन म्हणून काम करते. विद्यार्थी पालक शिक्षक यांच्यामधील संबंध संबंधात्मक माहिती यांच्यातील संबंध कसे असावेत याबद्दल माहिती दिलेली आहे.या संशोधनाचे उद्दिष्ट असे आहे की, समाजातील विविध क्षेत्रातील विषयांच्या प्रवाहाचा अभ्यास करणे, भारतीय शिक्षण मासिकात प्रकाशित होणारे लेख शैक्षणिक व संशोधनात्मक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहेत. लेखांमध्ये विविध आधारांचा समावेश दिसून आलेला आहे. या मासिकातील लेख हे प्रामुख्याने शिक्षण संशोधन, कुटुंब, राष्ट्रधर्म,शिक्षक, तंत्रज्ञान यासारख्या विषयांवर आधारित आहेत.प्रत्येक अंकामध्ये शिक्षण या विषयावर सर्वाधिक लेख आलेले आहेत,त्यामुळे शैक्षणिक दृष्टिकोनातून शैक्षणिक क्षेत्रात भारतीय शिक्षण मासिकाची भूमिका महत्त्वाची आहे हे दिसून येते.

**संदर्भ :**


- पेंडके, डॉ.सौ. प्रतिभा सुधीर,(२००५) भारतीय शिक्षण पद्धतीचा विकास.
- शंकर अभ्यंकर, हिंदू धर्माची वैशिष्ट्ये, भक्ती कोश खंड - चार भारतीय उपासना.
- पंडित, बन्सी बिहार(2008), शिक्षणातील संशोधन; नित्य नूतन.
- पाटील,एस.(2017), शिक्षण प्रणाली आणि समाजातील बदल. शिक्षण प्रकाशन पुणे.
- पाटील, नारायण (2020) संशोधन पद्धती, शं.ना.नवरे प्रकाशन.
- कुंडले, डॉ. म. बा., नंदनपवार, डॉ. बाबा ऑक्टोबर- नोव्हेंबर (२०११) शिक्षणसमीक्षा, नागपूर,
- Rai, P. (2015).Indian Education System: An overview. New Delhi Publishers.